- प्रकरण सातवे -

# उपसंहार

पेशवाईत सरदारांची जी अनेक घराणी उदयाला आली ज्यांच्या पराक्रमाच्या आधारावर पेशवाईचा डोलारा डौलाने डोलत राहिला त्यांत पटवर्धनांचे घराणे अनेक दृष्टींनी विशेष नावाजण्याजोगे आहे, उत्तरेकडे जशी होळकर, शिंदे, पवार यांच्या पराक्रमाने मराठेशाहीच्या अंमलाची लाट दिल्लीला जाऊन धडकली तशीच दक्षिणेकडे ती लाट श्रीरंगपट्टणाला जाऊन धडकली. पेशवाईचा दक्षिण हिंदुस्थानांत जो प्रभाव पडला त्या यशाचे पटवर्धन सरदार हे प्रमुख मानकरी होत.

वारणेच्या तह १७३१ ला कोल्हापूरचे छत्रपती व सातारा छत्रपती यांच्यात झाला. दोन्ही राजाच्या सिमा निश्चित झाल्या. कर्नाटकात पेशव्यांनी ज्या मोहीमा केल्या त्यात पटवर्धन सरदारांचा वाटा मोठा होता. पटवर्धन सरदार हे पेशव्यांनी निर्माण केलेले सरदार असून त्यांचे प्रमुख काम म्हणजे कोल्हापूरकर छत्रपतीवर दबाव आणणे व करवीरकरांच्या हालचालीवर नजर ठेवणे.

पटवर्धन हे मूळचे एक घराणे त्या घराण्याचा मूळ पुरुष हरभट पटवर्धन हे कोकणातले. पुढे ते देशावर येऊन त्यांच्या वारसांनी इचलकरंजी घोरपडे घराण्यांत नोकरी पत्करली. नंतर ते पेशव्यांचे सरदार म्हणून विश्वासास पात्र झाले. पटवर्धनांचे घराणे रामचंद्र हरींच्या

..९४/-

पराक्रमाने प्रथम उदयास आले आणि हा पराक्रमाचा वारसा तीन पिढ्यांनी केवळ राखला, एवढेच नव्हे तर तो मोठ्याच उत्कर्षास चढविला. पेशव्याकडून त्यांना जहागिरी मिळाल्या. परंतु कालांतराने मूळची एक असणारी जहागीरी भावाभावांत वाटण्या होऊन कुरूंदवाड, सांगली, मिरज, जमखंडी, तासगांव इत्यादी शाखा झाल्या.

या सर्व शाखांत तासगांव शाखेस अनन्य साधारण महत्व होते. कारण तासगांव शाखेतच मराठा इतिहासातील पराक्रमी पुरूष परशुरामभाऊ होऊन गेला. तासगांव जहागीरीचे प्रमुख ठिकाण असून सध्या ते सांगली जिल्ह्यांतील तालुक्याचे ठिकाण आहे. १८ व्या शतकांच्या उत्तरार्धास या शहरात अनन्य साधारण महत्व होते. कारण तासगांवला परशुरामभाऊंनी आपला चंदनी राजवाडा बांधलेला होता व तासगांवातच भाऊंचे वास्तव्य असे. सांगलीहून विटयास जाण्यास एक तास लागत असे म्हणून ह्या गांवास <u>तासगांव</u> हे नांव पडले अशी अख्यायीका तासगांव मधील वयोवृध्द लोक सांगतात.

पटवर्धनांचे मूळ पुरूष हरभटजी हे उत्तम वैदिक ब्राम्हण होत. ते देशावर येऊन नारायण महादेव जोशी ( इचलकरंजीकर घोरपडे ) यांचे पुरोहित म्हणून राहिले. नारायण महादेवचा मुलगा व्यंकटेश घोरपडे हा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथाचा जावई झाला व तेथून पुढे पेशव्यांच्या दरबारात पटवर्धनांचा हस्तक्षेप सुरू झाला. हरभटजीला जरी सात मुले असली तरी त्यातील गोविंदपंत, रामचंद्रपंत व त्रिंबकपंत हे स्वकर्तृत्वाने प्रसिध्दीस आले.

पटवर्धन घराण्यातील रामचंद्रहरी हा परशुरामभाऊंचा वडील. परशुरामभाऊंनी १७५७ ते १७९९ पर्यंत पराक्रम गाजवून त्यांनी कोल्हापूरकरां

विरुध्द जसे युध्द केले तसेच पेशव्यांच्या कर्नाटक मोहीमेत परशुरामभाऊंनी हिरीरीने भाग घेऊन महत्वाची कामगिरी केली. परशुरामभाऊंनी टिपू विरुध्द मोहीमेत भाग घेतला. तसेच १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत पेशव्यांचा एक बलाढ्य सरदार व सेनापती म्हणून हजर होता. परंतू पूढे कोल्हापूरकर आणि पटवर्धन सरदार यांचे संबंध बिघडतच जाऊन त्याची परिणीती पट्टणकुडीच्या ( १७९९ ) लढाईत झाली. ही लढाई करवीर छत्रपती शिवाजी दुसरे ( १७६२ ते १८१३ ) व परशुरामभाऊ यांच्यात लढली गेली व परशुरामभाऊंचा पराभाव होऊन त्यात ते मारले गेले.

थोडक्यात उत्तर पेशवाईत जी पराक्रमी माणसें झाली त्यांत भाऊंची प्रामुख्याने गणना केली पाहिजे. महादजी शिंदे, नाना फडणीस, हरीपंत फडके आणि परशुरामभाऊ हे चार थोर पुरुष उत्तर पेशवाईत मराठ्यांना लाभल्यामुळे पानीपतच्या अपयशानंतर मराठे पुन्हा प्रबळ झाले व इंग्रजांसारख्या जहांबाज लोकांचेहि मराठ्यांपुढे कांही चालले नाही. परशुरामभाऊ हे उपजतच लढाऊ वृत्तीचे होत. शौर्य, धैर्य आणि साहस हे भाऊंचे प्रमुख गुण होते. वयाच्या १४ व्या वर्षी भाऊ रणांगणावर उभे राहीले ते वयाला साठ वर्षे पर्यन्त सारखे रणांगणावरच वावरत होते.

खर्ड्याच्या लढाईत तर परशुरामभाऊ पेशव्यांचे मुख्य सेनापतीच होते. सवाई माधवरावांच्या मरणानंतर पेशवाईत जो गोंधळ मानला त्यात भाऊंचा राजकारणात लक्ष घालावे लागले. परशुरामभाऊंचे व दुसऱ्या बाजीरावांचे संबंध चांगले नव्हते परंतू नाना फडणीसांचा सर्व भार हा परशुरामभाऊंवरच होता. नाना म्हणतील ती कामगिरी भाऊ उठवीत होते.

..९६/-

... BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

परशुरामभाऊ हा शूर योध्दा, मुत्सद्दी म्हणूनच परिचित नव्हता तर त्यांने आपल्या जहागीरीत अनेक लोकोपयोगी कामे केलेली आहेत. त्याचा पण परामर्ष आम्ही ह्या प्रबंधात घेतलेला आहे. परशुरामभाऊ हे धार्मीक वृत्तीचे होते. गणपतीपुळे व राजापूरची गंगा ह्या ठिकाणी भाऊ नेहमी जात असत. अतीत, वैदिक, अभ्यागत, पुराणीक यांची ते योग्य संभावना करीत. विद्वान व पूज्य अशा शास्त्री पंडितांस व वैदिकांस भाऊंनी इनामे व वर्षासने दिली. देवालयें बांधणी व त्यांना देणग्या देणें हि कामेंहि भाऊंनी फार केली. परशुरामभाऊंनी श्रीकाशी क्षेत्री शिवालय बांधाले व लक्ष ब्राम्हणांस इच्छा भोजन घातले व तिथे भाऊंनी वाडा ही बांधाला.

पंढरपूर येथे भाऊंनी पांडुरंगाचा सभा मंडप, श्री मारुतीचें देवालय व नगारखान्याकरीता कमान बांधाली. श्री अमृतेश्वराच्या देवालयाचा जीर्णोध्दार केला. या क्षेत्रीही भाऊंनी श्री विठ्ठल मंदिरा सन्निधा एक वाडा बांधाला व तेथें आल्या गेल्याची सोय होण्याकरीतां अन्नछत्र ठेविले. पुणतांबे येथे श्री गोदावरीच्या काठी शिवालय, घांट व वाडा बांधाला आणि गांवकूस केले. परशुरामभाऊंचा रहावयाचा गांव तासगांव या ठिकाणी भाऊंनी श्री गणपतीचे देवालय बांधाले. गणपती हे भाऊंचे आराध्य दैवत आहे. या देवालयात श्री गणपती पंचायतनाची स्थापना केली. व या मंदिरावर अव्दितीय गोपूर बांधाला. तासगांव येथील हरकेश्वर देवळाचा ही भाऊंनी जीर्णोध्दार केला. चिंचणी येथे भाऊंनी परशुरामेश्वराचे देवालय बांधाले. तसेच भिलवडी येथे श्रीकृष्णाबाईस मोठा घाट बांधाला. चिंचणी गांवाजवळ भाऊंनी मोठे धारण बांधाले आणि जमखंडी येथे मोठा किल्ला बांधाला. असा हा शूर मराठा सरदार तासगांव शाळेत होऊन गेला. परंतु त्याच्या निधाना नंतर तासगांवची जहागीर फार काळ टिकली नाही व पुढे ती ब्रिटीशांनी

इतर कांही जहागीरी जशा जप्त केल्या तशी ही पण जहागीर जप्त केलेली दिसते. कारण तेथे भाऊबंदकी व आर्थिक गोंधळ माजलेला होता व तासगांव जहागीर १८६३ ला इंग्रजानी जप्त केली.

. . .